# शैक्षणिक परिवर्तनासाठी कार्यरत अशा उपक्रमशील शिक्षकांना
# माननीय श्री. शरद पवार इन्स्पायर फेलोशीप

## भूमिका

शिक्षण उद्यासाठी असते. उद्याचे सुजाण, सतर्क, सर्जनशील, कर्तबगार व सुसंस्कृत नागरिक घडविणे खऱ्या, उचित व उत्तम शिक्षणाकडून अपेक्षित असते. शिकावे कसे, शिकण्याचा आनंद कसा घ्यावा-द्यावा आणि आजन्म शिकत कसे राहावे हे शिकविते ते खरे शिक्षण. शिकता-शिकता जे उद्याची आव्हाने पेलायला सज्ज करते, उद्याच्या संधींचे सोने करायला शिकवते ते खरे शिक्षण.

एकविसाव्या शतकातील एकविसाव्या वर्षापासून शालेय शिक्षणाच्या मुलभूत पुनर्रचनेची यादृष्टीने नितांत आवश्यकता आहे. कारण विशेषत: गेल्या वर्षीपासून दैनंदिन जीवनाचे संदर्भ पार बदलून टाकणाऱ्या अनेक वेगवान महाप्रवाहांचा प्रभाव एकाच वेळी जगभर वाढू लागला आहे.

बदल घडवून आणणारे शेती, औद्योगिक क्रांती, इ. महाप्रवाह इतिहासात पूर्वीही येऊन गेले आहेत. परंतु त्यांचे जगभर परिणाम दिसायला शतके लागली. विद्युत उर्जेच्या महाप्रवाहाने जगाला कवेत घ्यायला, पृथ्वीवर 'इलेक्ट्रिकल सिव्हिलायझेशन' साकारायला शतक लागले. संगणक व माहिती तंत्रज्ञानाच्या महाप्रवाहाने जगावर अधिराज्य प्रस्थापित करायला अर्धशतक लागले. आताचे बदल घडविणारे महाप्रवाह मात्र कमालीचे वेगवान आहेत. त्यांचे परिणाम अनुभवास यायला आता पाच-दहा वर्षेही लागत नाहीत. त्यांच्या प्रचंड वेगापुढे मानवी समाजाची दमछाक होताना आपण पाहतो आहोत.

वेग, अधिक वेग आणि प्रचंड वेग हेच त्या महाप्रवाहांचे आणि त्यांनी प्रभावित केलेल्या मानवी जीवनाचे आता व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. यातले काही महाप्रवाह अनिष्ट आहेत तर काही इष्ट. उदाहरणार्थ एकीकडे अनिष्ट हवामान बदल तर दुसरीकडे इष्ट ज्ञानक्रांती. हे महाप्रवाह दीर्घ काळ टिकून राहतील व वेगाने वाढत जातील अशी चिन्हे आहेत. या महाप्रवाहांमुळे मानव जातीपुढे व विशेषत: विद्यार्थ्यांपुढे जशी अनेक नवी आव्हाने उभी ठाकली आहेत तशाच नव्या

संधीही निर्माण झाल्या आहेत. या आव्हानानांबद्दल, संधींबद्दल सविस्तर विवेचन ‘परिशिष्ट’मध्ये दिले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये या आव्हानांच्या अनुषंगाने अनेक शिफारशी केल्या आहेत आणि कार्यक्रमही सुचवले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी तयार केलेला कृती कार्यक्रम (SARTHAQ भाग १ आणि २), तसेच निपुण भारत अभियान हे दस्तऐवज वाचा. भारतीय संविधानाच्या तरतुदींच्या अनुषंगाने मूल्यशिक्षण, स्वयंअध्ययन आणि सहअध्ययन यांचा अध्ययन-अध्यापन आणि मूल्यमापन प्रक्रियेत प्रभावी वापर, विविध विषयांचा परस्परांशी आणि कला व खेळ यांच्याशी समन्वय, बहुवर्ग अध्यापन, वाचताना वाचनाचा वेग आणि आकलन वाढवण्यासाठी घेतलेले उपक्रम, पालक आणि स्थानिक समाज यांचा शालेय कामकाजात आणि अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सहभाग, शाळेची इमारत आणि परिसर यांचा शैक्षणिक साधन म्हणून वापर, अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत डिजिटल लर्निंगचा प्रभावी वापर, असे अनेक उपक्रम आयोजित करता येतील. ही केवळ उदाहरणे म्हणून दिली आहेत, तरी परंतु आपण आपल्या विद्यार्थ्यांच्या गरजा  लक्षात घेऊन, कोणते उपक्रम निवडावे याचे संपुर्ण स्वातंत्र्य शिक्षकांना असेल.

**Themes**

a) Teachers who involved in Scout Guide (स्कॉऊट गाइड)

b) Climate Change (हवामान बदल)

c) Special Education (विशेष शिक्षण)

d) Children’s Health (Mental and Physical) (मुलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य)

e) Sports (खेळ)

f) Nature’s friend (निसर्ग मित्र, पर्यावरण रक्षक)

g) Performing Arts (कला)

h) Crafts and Culture (संस्कृती आणि हस्तकला)

i) Gender Equity (लिंग समभाव)

j) Promoting Scientific Temper (वैज्ञानिक दृष्टिकोण रुजवणे)

k) Inculcating Values of Indian Constitution (संविधानिक मूल्ये रुजवणे)

l) Reading Comprehensive (वाचन संस्कृति)

## ***फेलोशिपसाठी नियमावली***

१) आपण ज्या संस्थेत काम करीत आहात त्या संस्थेचे 'नवोपक्रम' करण्यासाठी तुम्हाला परवानगी दिल्याचे पत्र सुरुवातीसच द्यावे लागेल.

२) आपण जो नवोपक्रम हाती घेणार आहात तो यापूर्वी केलेला नसावा. मात्र पूर्वी केलेल्या प्रयोगाचे विस्तारीकरण (Extension ) करता येईल.

३) आपण करीत असलेला नवोपक्रम इतर कोणत्याही संस्थेत सादर केलेला नसावा तसेच पुढेही तो सादर करता येणार नाही.

४ ) आपण घेतलेला उपक्रम कोणाचीही कॉपी असू नये. जर दुसऱ्याची एखादी कल्पना घेवून काम करणार असाल तर तशी त्या व्यक्तीची पूर्वपरवानगी घेतलेली असावी.

५ ) यशवंतराव चव्हाण सेंटर, ज्या ज्या वेळी यासंबंधीची प्रशिक्षणे किंवा बैठका घेईल त्यावेळी अशा बैठकास किंवा प्रशिक्षणास उपस्थित राहणे बंधनकारक राहील. अपरिहार्य अडचण असेल तर तशी कल्पना यशवंतराव चव्हाण सेंटरला देवून परवानगी घ्यावी.

६ ) यशवंतराव चव्हाण सेंटरनी दिलेल्या वेळेतच आपला उपक्रम पूर्ण करणे अपेक्षित आहे. उपक्रमास उशीर झाला तर आपल्या फेलोशिपबाबतचा अंतिम निर्णय चव्हाण सेंटरला असेल.

७ ) आपला उपक्रम चालू असताना यशवंतराव चव्हाण सेंटरचे प्रतिनिधी कधीही तरीही पूर्व कल्पना देवून भेट देण्यास येतील. त्यावेळी त्यांना सहकार्य करणे अपेक्षित आहे. जर या प्रतिनिधिंना कामाबाबत चुकीच्या गोष्टी ध्यानात आल्या तर फेलोशिप संबंधी यशवंतराव चव्हाण सेंटर निर्णय घेईल.

८) नवोपक्रम अंतिम अहवाल सादर करताना आपल्या संस्था प्रमुखाचे पत्र जोडणे आवश्यक आहे.

# अर्ज प्रक्रिया

| | |
|---|---|
| १. | इच्छुक शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ पूर्वी<br><br>https://apply.sharadpawarfellowship.com या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावा |
| २. | अर्जदारांनी फेलोशिपसाठी हाती घेत असलेल्या **"शैक्षणिक परिवर्तन उपक्रमा"** विषयी खालील मुद्दयांच्या आधारे सुमारे १००० शब्दांमध्ये (मराठी किंवा इंग्रजी भाषेत) अर्जामध्ये दिलेल्या जागेत लिहावे. |
| | **२.१ उपक्रमाचे शीर्षक** |
| | **२.२ उपक्रमाची गरज आणि महत्त्व**<br><br>**उपक्रम निवडण्याचे कारण, वेगळेपण आणि उपयुक्तता याबाबतचा तपशील** |
| | **२.३ उपक्रमाची उद्दिष्टे**<br><br>हा उपक्रम आपण का निवडला आणि त्याचा काय फायदा, कोणाला होणार आहे, कशाप्रकारे होणार याबाबतचा तपशील. |
| | **२.४ उपक्रमाची वैशिष्ट्ये –**<br>**अ. उपक्रमपूर्व स्थिती**<br>**आ. संबंधित व्यक्ती/तज्ज्ञ यांच्याशी चर्चा**<br>**इ. उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या साधनांचा विचार**<br>**ई. उपक्रमांतर्गत कृतींचे टप्पे आणि त्यांचे क्रम (संभाव्य वेळापत्रकासह)**<br>**उ. अपेक्षित उपक्रमोत्तर कृती**<br>**ऊ. उपक्रमाची अंमलबजावणी केल्याबद्दल सादर करावयाचे पुरावे** |
| | **२.५ उपक्रमाची अपेक्षित फलनिष्पत्ती** |
| ३. | **आपण प्रस्तावित करीत असलेला उपक्रम हा नवीन असावा.** |

| | |
|---|---|
| ४. | **विषयनिहाय अभ्यासक्रमातील नेहमीच्या वेळापत्रकात समाविष्ट असलेले अध्ययन, अध्यापन, मूल्यमापनविषयक उपक्रम या फेलोशिपमध्ये अपेक्षित नाहीत, कृपया याची नोंद घ्यावी.** |

***फेलोशिपच्या अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक***

| | | |
|---|---|---|
| १ | फेलोशिपची घोषणा | १२ जुलै २०२४ |
| २ | ऑनलाइन फॉर्म सबमिशन | १२ जुलै २०२४ ते १२ ऑक्टोबर २०२४ |
| ३ | अर्जाची छाननी आणि निकालाची तयारी | १२ ऑक्टोबर २०२४ ते १२ नोव्हेंबर २०२४ |
| ४ | निकालाची घोषणा | २४ नोव्हेंबर २०२४ |
| ५ | फेलोशिप प्रदान सोहळा कार्यक्रम | रविवार ०८ डिसेंबर २०२४ |

***फेलोशिपचा कालखंड – मे २०२५ ते मे २०२६***

| | | |
|---|---|---|
| १ | प्रथम कार्यशाळा | ५, ६, ७ मे २०२५ |
| २ | प्रकल्पाना भेटी | १५ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२५ |
| ३ | द्वितीय कार्यशाळा | १, २, ३ नोव्हेंबर २०२५ |
| ४ | तृतीय कार्यशाळा व प्रकल्प अहवालाचे सादरीकरण | ४, ५, ६ मे २०२६ |

**निवड प्रक्रिया**

१) तज्ज्ञ समितीकडून अर्जांची छाननी पूर्ण करण्यात येईल.
२) पात्रतेचे निकष अधिक गुणवत्तेने पूर्ण करणाऱ्या मोजक्याच शिक्षकांची तज्ज्ञांतर्फे (आवश्यकतेनुसार शाळाभेटीसह) प्रत्यक्ष/ दूरस्थ मुलाखतींसाठी निवड करण्यात येईल.
३) मुलाखत शक्यतो इच्छुक शिक्षकांनी अर्जासोबत पाठविलेल्या टिपणावर आधारित असेल.
४) मुलाखतीच्या गुणवत्तेच्या मूल्यमापनानुसार फेलोशिपसाठी ४० शिक्षकांची (२० प्राथमिक आणि १० माध्यमिक शिक्षक आणि १० एकात्मिक बी.एड करणारे विद्यार्थ्यांची) निवड करण्यात येईल.
५) निवड झालेल्या शिक्षकांशी तसेच एकात्मिक बी.एड करणारे विद्यार्थ्यांशी संपर्क साधून त्यांची फेलोशिप स्वीकारण्याविषयीची लेखी अनुमती घेण्यात येईल.
६) आवश्यकतेनुसार त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांचीही सहसंमती घेण्यात येईल.

**पूर्वतयारी:**

मे २०२५ ते मे २०२६ या कालावधीत खालील गोष्टी करण्यात येतील:

१) निवड झालेल्या फेलोजचे किमान ३ दिवसांचे प्रशिक्षण शिबीर.
२) फेलोने हाती घ्यावयाच्या उपक्रमांचे सादरीकरण व चर्चेअंती निश्चिती,फेलोच्या नियोजित उपक्रमांचे व त्यांच्या मूल्यमापनाचे नियोजन, संसाधनांची जुळवाजुळव तसेच सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड, पालकांची अनुमती, मासिक व अंतिम प्रकल्प-अहवालांची रूपरेषा, इ.
३) गट निहाय मेंटर्स नेमेणे.

**फेलोशिपमधील उपक्रमाचा कालावधी:**

१**) मे २०२५ ते मे २०२६** असेल.
२**) या** कालावधीत फेलोजनी वर निश्चित केलेले उपक्रम करून त्यांचे **मासिक अहवाल** प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला देणे अनिवार्य राहील.
३**)** एप्रिल २०२६ मध्ये फेलोजनी सविस्तर अहवाल लेखन करून संयोजकांकडे पाठविणे अपेक्षित आहे.( हार्ड आणि सॉफ्ट कॉपी)

**फेलोशिप सांगता शिबीर:**

१) एप्रिल/मे २०२६ मध्ये २ दिवसांचे सांगता शिबीर आयोजित करण्यात येईल.

२) या शिबिरामध्ये सर्व फेलोज् चे त्यांच्या मार्गदर्शकांच्या उपस्थितीत सादरीकरण होईल व त्यावर इतर तज्ज्ञांबरोबर चर्चाही होतील. त्यात फेलोशिपनंतर शैक्षणिक परिवर्तनाच्या प्रयत्नांचे सातत्य राखण्याविषयी सूचना देण्यात येतील.

३) प्रशस्तीपत्रांचे वितरण व फेलोज् नी केलेल्या उपक्रमांचे फेलोशिप पोर्टलवर प्रकाशन करण्यात येईल. पुढे पोर्टलला योग्य ती प्रसिद्धी देऊन राज्यातील विशेषत: विद्यार्थी, पालक व शिक्षकांपर्यंत ते उपक्रम पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

४) या पोर्टलवर फेलोज् चे ब्लॉग्ज, इतर शिक्षकांचे प्रतिसाद, सूचना, प्रश्नांना उत्तरे, इ. सेवा सुरू करता येतील. उत्तरोत्तर या पोर्टलवर अशा उपक्रमांची महासूची तयार होईल व शैक्षणिक परिवर्तन करू इच्छिणाऱ्या शेकडो शिक्षकांना ती मार्गदर्शक व स्फूर्तीदायक ठरेल.

## फेलोशिपचे तपशील

| | |
|---|---|
| **फेलोशिपसाठी वयोमर्यादा** | **वय वर्षे ४५ किंवा त्यापेक्षा कमी वय असणारे पूर्णवेळ शिक्षक** |
| **फेलोशिपचा कालावधी** | **मे २०२५ ते एप्रिल/मे २०२६** |
| **फेलोशिपसाठी पात्रता** | **१. परिशिष्टामध्ये अंतर्भूत केलेल्या उद्दिष्टांशी सुसंगत, नियमित अध्यापन करत विद्यार्थ्यांच्या सहभागाने चालणारे व**<br>**२. वर्षभर विकसित होत जातील असे अभ्यासक्रमेतर व वेळापत्रकेतर उपक्रम करत असलेले/ करू इच्छिणारे शिक्षक अर्ज करण्यासाठी पात्र समजण्यात येतील. तसेच २०२५ -२६ या शैक्षणिक वर्षात बदली न होणाऱ्या शिक्षकानी अर्ज करावा.** |

| | |
|---|---|
| फेलोशिपची संख्या | २० प्राथमिक आणि १० माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक आणि Integrated B. Ed चे १० विद्यार्थी असे एकूण ४०. |
| अर्जदारांचे कार्यक्षेत्र | महाराष्ट्र असेल |
| फेलोशिपची रक्कम | निवड झालेल्या प्रत्येक शिक्षकास वार्षिक ६०,०००/- (रुपये साठ हजार फक्त). यातील ६०% रक्कम शिक्षकाना प्रत्यक्षात फेलोशिपमधील उपक्रमांसाठी लागणारी साधने, संभाव्य प्रवास, इत्यादीसाठी देण्यात येईल आणि उर्वरित ४० % रक्कम ही कार्यशाळा आणि मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनासाठी खर्च करण्यात येईल. |

## अर्ज प्रक्रिया

१. इच्छुक शिक्षकांनी दिनांक १२ ऑक्टोबर २०२४ अखेर https://apply.sharadpawarfellowship.com या संकेत स्थळावर ऑनलाईन अर्ज करावा.

२. अर्जदारांनी फेलोशिपसाठी हाती घेत असलेल्या "शैक्षणिक परिवर्तन उपक्रमा" विषयी खालील मुद्द्यांच्या आधारे सुमारे १००० शब्दांमध्ये (मराठी किंवा इंग्रजी भाषेत) अर्जामध्ये दिलेल्या जागेत लिहावे.

२.१ उपक्रमाचे शीर्षक

२.२ उपक्रमाची गरज, उपक्रम आपण का निवडला

२.३ उपक्रमाचे महत्व

२.४ उपक्रमाचे नाविन्य व वेगळेपण - शासकीय योजनेपेक्षा वेगळे परंतु शासकीय योजनांना पूरक

२.५ आपण यापूर्वी काही नवोपक्रम केले आहेत काय ?

२.६ यापूर्वी शासनास किवां इतर संस्थेस आपण काही नवोपक्रम सदर केले आहेत काय ?

२.७ आपल्या नवोपक्रमाची दखल घेतली गेली आहे काय ?

असल्यास कोणत्या स्तरापर्यंत

जिल्हास्तर ☐

राज्यस्तर ☐

राष्ट्रीयस्तर ☐

२.८ उपक्रमासाठी लागणारी साधने व सोयी

२.९ आपला उपक्रम साधारण किती दिवस चालेल ?

३.० आपल्या उपक्रमाचे स्थूल वेळापत्रक

३.१ उपक्रमाची फलनिष्पत्ती पाहण्यासाठीची व्यवस्था

३.४ उपक्रमासाठीचे अंदाजपत्रक

३.५ उपक्रमासाठीचे वेळापत्रक

४ . आपण प्रस्तावित करत असलेला उपक्रम पूर्वीपासून राबवत असाल तर त्याचा तपशील (छायाचित्र, चित्रफित, परखड मूल्यमापन इ. अर्जासोबत जोडावे.

५ . विषयनिहाय अभ्यासक्रमातील नेहमीच्या वेळापत्रकात समाविष्ट असलेले अध्ययन, अध्यापन, मूल्यमापनविषयक उपक्रम या फेलोशिपमध्ये अपेक्षित नाहीत, कृपया याची नोंद घ्यावी.

प्रतिज्ञा पत्र : मी हा उपक्रम यापूर्वी कोणत्याही खाजगी/शासकीय किंवा निमशासकीय संस्थेस सादर केलेला नाही.

*__शिक्षण फेलोशिप वेळापत्रक__*

| | | |
|---|---|---|
| १. | अर्ज करण्याची अंतिम मुदत | १२ ऑक्टोबर २०२४ |
| २. | अर्जाची छाननी आणि निवड प्रक्रिया | १३ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर २०२४ |
| ३. | निवड झालेल्या शिक्षकांची यादी जाहीर करणे | २४ नोव्हेंबर २०२४ |

| | | |
|---|---|---|
| ४. | **फेलोशिप प्रदान सोहळा आणि नवीन फेलो व जूने फेलो यांचा एकत्रित परिचय आणि संवाद** | ०८ डिसेंबर २०२४ |
| ५. | **प्रथम कार्यशाळा** | २७, २८, २९ मे २०२४ |
| ६. | **प्रकल्पांना भेटी** | १५ ऑगस्ट ते १५ ऑक्टोबर २०२५ |
| ७. | **द्वितीय कार्यशाळा** | १, २, ३ नोव्हेंबर २०२५ |
| ८. | **तृतीय कार्यशाळा व प्रकल्प अहवालाचे सादरीकरण** | ४, ५, ६ मे २०२६ |

**योगेश कुदळे**

शिक्षण विभाग प्रमुख
यशवंतराव चव्हाण सेंटर,
जन.जगन्नाथराव भोसले मार्ग,
नरिमन पॉईंट, मुंबई – ४०००२१

**संजना पवार**

सहाय्यक, शिक्षण विभाग
संपर्क – 8291416216

ई-मेल आयडी – education@chavancentre.org

फोन नं : +91 93707 99791